

आपल्या जैवविविध शेतामध्ये होठी बी.राजम्मा

पिकांची जैवविविधता

पी. व्ही. सथीष

भारताच्या दख्खन प्रदेशात 60,000 महीला शेतकरी जैवविविध पध्दतीची शेती करुन आपल्या कुटुंबाचा उदरनिर्वाह करतात, त्यांचा स्वाभिमान आणि संस्कृती जतन करतात. त्याबाबतचे त्यांचे ज्ञान व यशोगाथा सर्व देशभर, अनेक संस्थांपर्यंत पोहोचल्या आहेत. अगदी जागतीक पातळीवर त्याला मान्यता मिळाल्याचे दिसते आहे.

ही 2003 ची गोष्ट आहे. भारताच्या आंध्रप्रदेश राज्यातील एका झोपडी वजा घरामध्ये लहान शेतकऱ्यांच्या कुंटुंबातील सुमारे 50 महीला दिडगी गावात एकत्र आलेल्या आहेत. विडियोवर वरिष्ठ शेती तज्ञांशी समोरासमोर चर्चा करीत आहेत. सम्माम्मा (महीला शेतकरी) आपल्या 3 एकर शेतीमध्ये कोरडवाहु परिस्थितीमध्ये विविध प्रकारच्या 96 पिंकांचे उत्पादन कसे घेते व त्यामध्ये जैवविविधतेचे तिच्यासाठी काय महत्व आहे ते विस्ताराने सांगते आहे. एवढयात दुस-या बाजुने एक वरिष्ठ शास्त्रज्ञ तिला थांबवतात. ''नाही नाही! तुम्ही जैवविविधतेची काळजी करु नका. ते आम्हा शास्त्रज्ञांचे काम आहे. आणि आम्ही तुम्हाला बीयाणे सुचवू''...

अघापही बहुतांश वैज्ञानीकांचा असा समज आहे की शेती विषयक शास्त्र व ज्ञान हे केवळ त्यांनाच माहीती आहे. आणि कृषि पध्दती, पीके, मशागती इ बाबतच्या चर्चामध्ये लहान शेतकरी विशेषतः महीला शेतकऱ्यानी मध्ये भागच घेऊ नये. पण दख्खनच्या या महीलांनी त्यांची ही समज अनेक बाजुने चुकीची ठरवुन दिली.

महीला एक दुर्बल घटक असुनही लहान शेतीची मुलतत्वे व जैवविविधता शेती प्रणालीला चिकटुन राहील्यामुळे त्यांच्या जीवणात प्रचंड बदल निर्माण झाला.

जैवविविध कृषि प्रणाली

दिडगी गावातील महीला शेतक-यांनी अति उत्तम जैवविविध कृषी प्रणाली विकसीत केली आहे. त्यामध्ये बरेच सामान्य गुणविशेष पहायला मिळतात. जसे ही प्रणाली असिंचित शेतावर होते, दोन एकरापेक्षा कमी क्षेत्र व फार सुपीक नसलेल्या जमिनीमध्ये राबवता येते. पुर्णपणे अरासायनीक पध्दतीने करता येते, अगदी छोटयाशा जमिनीच्या तुकडयावर 12 ते 23 प्रकारची पीके एकत्र घेतली जातात. ही शेती प्रणाली राबवणाऱ्याना बाजारातुन आपलं अन्नधान्य विकत आणावे लागत नाही. दख्खनच्या लहान शेतकरी महीला तर बीज साठवणुक करणाऱ्या महिला आहेत. त्या फक्त बीज सवर्धनच करीत नाहीत तर पेरणीच्या वेळी कोणकोणत्या पिकांची मिश्रखत्र पेरणी करायची हे ठरवतात. हे खरेत्तर परस्पर पुरक आहे. म्हणजे या महीलांच्या शेती करण्याच्या पध्दतीमुळे जैवविविध कृषिप्रणाली उभी राहते व जैवविविधता शेती पध्दतीमुळे महीलांना त्यांच्या पध्दतीने शेती करता येते. या महीलांना जैवविविध इतकी महत्वाची का वाटते? कृषिखात्याने सागींतल्यानुसार एक किंवा दोन पिके घेण्यास त्यांचा काय व आक्षेप आहे? हया महीला पिवळी ज्वारी खास करुन पिकवु इच्छितात जी कृषी खात्याने मुददाम दुर्लक्षित केलेली आहे. शास्त्रज्ञांच्या मते हया पिकांना बाजारभाव कमी आहे. परंतु दलित महीलांना हे माहीती आहे की पिवळी ज्वारी म्हणजे सकस अन्न , चांगला चारा , साध्या मातीत, बीन पाण्याचे पीक त्याची धांट कुपंनीसाठी, घराचे कुड (भिंती) बनवण्यासाठी वापरता येतात. असे अनेक फायदे या पिवळया ज्वारीचे आहेत. हे सगळे उपयोग /वापर, फायदे हया महीलांच्या नियंत्रणात राहु शकतात. त्यासाठी त्याना कोणा दुसऱ्यावर अवलंबुन राहण्याची आवश्यकता नाही. अशा पिकाला या महीलांनी एवढे महत्व देणे याचा अर्थ या महीलांची कृषि व अन्न हयाकडे पाहण्याची वेगळी दृष्टी आहे हे जाणवते.

अन्नाच्या पलिकडचे

विशेषतः लहान शेतकरी कुटुंबातील व दलित समाजातील गरीब महीलासाठी शेती संस्कृती व जैवविविधतेच्या तत्वांना चिकटुन राहणे हे त्यांना अत्यंत गरजेचे वाटते. नाहीतर आज आपण शेतकरी आत्महत्या पाहतो हया विशेषतः अशा स्तरातील आहेत की जे शेतकरी व्यापारी पध्दतीने बाजारावर नजर ठेवुन महागडे बीयाने, महागडे औषधे , रसायने वापरतात. व एकच प्रकारचे नगदी पीक घेण्याकडे त्यांचा कल असतो. परंतु या लहान महीला शेतकरी ज्या जैवविविध पध्दतीची कृषी प्रणाली अवलंबवितात त्याच्यामध्ये शेतकरी आत्महत्या होताना दिसत नाही. कृषि जैवविविधता हा त्यांच्या परंपरेचा भाग तर आहेच पण सोपा व शेती करण्याचा सरळ तार्किक मार्ग आहे. त्यांना पुर्ण जाणीव आहे की वातावरण बदलाला सामोरे जाण्यासाठी जैवविविध प्रणाली त्यांच्या साठी सुरक्षा कवच आहे. एवढेच नव्हे तर जी पिके शेतात घेतली जातात त्यातुन त्यांच्या घरची अन्नसंस्कृती झळकते व स्वयंपाक घरात शिजणार अन्न आणि शेतातील पीक यामधील नातं अंगदी ठळकपणे पहावयास मिळते. उदाहरणार्थ ज्वारीपासुन बनवलेले पदार्थ तुर डाळी पासून बनवलेल्या पदार्थाबरोबर खाल्ले जातात तर शेतीमध्ये ज्वारी व तुरीचे पीक सोबतच वाढत असते. 'हे शेत ते स्वयंपाक घर' मॉडेल च ख-या अर्थाने गेल्या अनेक शतपासून त्यांच्या शेतावर जैवविविधता जीवंत ठेवण्यास कारणीभुत ठरले आहे. खंर तर या पुर्ण प्रक्रियेमध्ये महीलाच्या वाटयाला अनेक कामे जात असल्याने त्याच हया परंपरेचे वाहक आहेत असं म्हणणे योग्य आहे. जैवविविध शेती केवळ भौतीक जीवन फुलवत्ते असे नसुन नैतीक आत्मिक व पर्यावरणीय अंगांनी जीवन परिपुर्ण होते. येथील लोक जैवविविधता आपल्या धार्मीक सणातुन साजरी करतात. जसे

अन्न धोरणाचे नवे रुप

भारता मध्ये ठराविक पिकांनाच फार प्राधान्य दिले जात आहे. आणि हे सरकारी धोरण आहे. अनादी कालापासुन आपल्या देशात स्थानिक अशी विविध भरडधान्य व कडधान्ये पिकातात व ती पिकेंच त्या प्रदेशातल्या लोकांचे प्रमुख अन्न होते. पण ही पिके मात्र दुर्लक्षित केली आहेत.सन 2013 मध्ये सरकारने अशा अन्नधान्याचे महत्व पहील्यांदाच मान्य केले असे वाटते कारण त्या धान्यांचा उल्लेख राष्ट्रीय अन्न सुरक्षा कायदयामध्ये केला आहे. डेक्कन डेवलपमेंट सोसायटी आणि मिलेट नेटवर्क ऑफ इंडिया यानी दशकापेक्षा जास्त काळ या बाबत संघर्ष केला. त्याचे फलीत झाले आणि भरडधान्ये आता मान्यतेनुसार आपल्या देशातील सार्वजनीक अन्न व्यवस्थेमध्ये आंतर्भुत झाले. हा आनंद फक्त केवळ नेटवर्क व डेक्कन सोसायटीचा नसुन त्या महीलांचा आहे. ज्यानी हा वारसा सातत्याने जतन केला आहे. त्यानी रेडियो व छोटया चित्र फितींचा वापर करुन सर्वापर्यंत ही यशोगाथा पोहोचवेली . आग्रही पणा व विचारांचा पक्केपणा या आधारावर त्यांच्या सामाजिक, आर्थिक लिगंभेदामुळे निर्माण झालेल्या दुर्बलतेवर या महीलांनी विजय मिळवला आणि राष्ट्रीय पातळीवर अन्नधान्य धोरणाला एक नवे रुप दिले. इतकेच नव्हे तर हा संदेश आम्ही सर्व जे भरडधान्याला इतके महत्व देतो 2013 मध्ये हे विचार आफ्रिकेपर्यत घेऊन गेलो. कारण या भरडधान्याचा खरा उगम हा आफ्रिकेतला आहे. तेथील लोकांना ते जाणवून दिले व तेथे पण ही चळवळ सुरु केली. आता तर भारत व आफ्रिका या

दोन खंडात भरडधान्याच्या प्रोत्साहनासाठी परस्परामध्ये एक नेटवर्क उभे राहीले आहे.

एंगलागट्टी पूनम हा हिवाळयात साजरा होणार सण. त्यावेळी काढणीला आलेल्या विविध पिंकांचे तोरण प्रत्येक घराच्या दरवाज्यावर टांगले जाते. जणुकाही हे सांगण्यासाठी की बघा माझ्या शेतामध्ये एकाच वेळी काय काय पिकत आहे. अशा पिकांना महिला पैशापेक्षाही जास्त साभांळतात व जपतात.आणि म्हणुनच त्यांचे बीयाणे विकले जात नाही आणि खरेदी पण केले जात नाही.तर ते एकमेकाला वाटले जाते.

सांगायला अभिमान वाटतो

डेक्कन डेवलपमेंट सोंसायटी ही तळागाळात काम करणारी एक स्वयंसेवी संस्था, लहान महिला शेतकरी, ज्या आर्थिक सामाजिक दृष्टया दुर्बल होत्या, यांचे शेती बाबतचे ज्ञान गेल्या 25 वर्षापासून सर्वापर्यंत पोहोचवण्याचे कार्य डी.डी.एस करीत आहे. हया भागातील आर्थिक व सामाजिक दुर्बल घटकातील, दलित महीला हे त्यांचे ज्ञान इतरापर्यंत पोहोचवण्यासाठी शेकडो वेळा पेरु, कबोंडिया अशा देशामध्ये जावुन आल्या आहेत. हे ज्ञान त्यांनी केवळ तेथील शेतक-यांना नव्हे तर शास्त्रज्ञ व धोरण बनवणाऱ्या देखिल दिले

आंतरराष्ट्रीय पातळीवर मोठमोठया परिषदांमध्ये या महीलाना अनेकानी ऐकले आहे. 2003 मध्ये कॅनडा येथील व्हिक्टोरिया मध्ये जागतिक जैविक परिषदेमध्ये या महीलांनी मांडणी केली. या मधील अनेकानी या महीलाच्या ज्ञानाचे व मांडणीचे आश्चर्य व कौतुक केले.

या अनुभवातुन निर्माण झालेल्या आत्मविश्वासाच्या जोरावर आता या महीला फिरते जैवविविध सण साजरे करु लागल्या . 1998 पासून अगदी दरवर्षी एका महीन्यात किमान 50 गावात हया महीला पोहोचतात व लोकांना अनेक बाबींचे शिक्षण आपल्या स्वानुभवातुन देतात. त्या मध्ये प्रामुख्याने पर्यावरणीय शेती संकल्पना व त्याचे फायदे, बीयाणावर आपल नियंत्रण, जैविक शेतमालाची बाजारपेठ, शेतकरी व माती याचें मजबुत संबंध, शेती आणि पर्यावरण यांची परस्पर पुरकता अशा विविध विषयावर चर्चा केल्या जातात. आतापर्यंत या महीला सुमारे 1,50,000शेतक-यापर्यंत पोहोचल्या. या भागातील पारंपारीक बीयाणे व पिके त्यांना दाखविली. भारत सरकारने हे ओळखले व मान्यही केले की हे जैवविविधता मेळावे लोकांच्या संस्कृतीचा अत्यंत महत्वाचा भाग आहेत.

जागतिक मान्यता

2003 मध्ये ज्या महीलांना कृषि वैज्ञानिकांनी बोलु दिले नव्हते त्या महीलांच्या जैवविविधतेच्या ज्ञानाला, अनुभवाला मात्र आता राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय पातळीवर मान्यता मिळत आहे. अंजम्मा नावाची 55 वर्षाची लहान शेतकरी महीला कधीही शाळेत गेली नाही. तिला लिहीता वाचता येत नाही पण ती आंध्रप्रदेशच्या राज्य जैव विविधता मंडळावर तज्ञ सदस्य आहे. सरकारी अधिकारी कृषि वैज्ञानीक स्वयंसेवी संस्था प्रतिनिधी, वृत्तपत्र व वृतवाहीन्यांचे प्रतिनिधी अगदी नियमीतपणे या भागात भेटी देत असतात. या महीलांची शेती, पीके, बीयाणे पाहण्यासाठी व शिकण्यासाठी अनेक वेळा वृत्तपत्रातुन व टी.व्ही चॅनलवरुन त्यांच्या बातम्या प्रसारीत होतात. या भागातील सुमारे 50,000हेक्टर जमिनीवर ज्या पध्दतीने पीके घेतली जात. या भागात आहेत त्या भागाला ''जैवविविधता कृषिवारसा क्षेत्र'' म्हणुन करण्याचा प्रस्ताव भारतीय राष्ट्रीय जैवविविधता मंडळाच्या विचाराधीन आहे. असे हे भारतातले एकमेव उदाहरण आहे. आंतरराष्ट्रीय जैविक विविधता परिषदेने हे ठरवले आहे की अशा क्षेत्रांचा व प्रयोगांचा सन्मान करायचा की जेणे करुन या प्रयोगाना मोठया प्रमाणावर पसरवता येईल. या मध्ये अशा प्रयोगांना , क्षेत्राला राष्ट्रीय उघानाचा दर्जा निर्माण करुन देणे , संरंक्षण करणे, विशेष दर्जाच्या सुविधा पुरवणे व तेथील शेतक-यांना वेगवेगळे लाभ व सुविधा पुरवणे यांचा समावेश असेल. यातुन एक भक्कम संदेश सर्वत्र पसरवल्या जाईल की भारत सरकार अशा वंचित लहान शेतक-यांना सहयोग देते व त्यांनी जैवविविधते साठी केलेल्या



पिकातुन बीयाणाची निवड करणे हे गुतांगुतींचे काम असते. ते बंसतपूर नरसाम्माया महीला शेतकरीला अवगत आहे.

योगदानाची गाभींर्याने दखल घेते. या सर्वाकडे तुम्ही कसे बघता असा महीलांना जेव्हा प्रश्न विचारला तेव्हा महाबत्तपुर स्वरुपा ही महीला शेतकरी म्हणाली ''आम्हाला कोणत्याही प्रकारे आर्थिक फायदयामध्ये रस नाही पण आमच्या योगदानाची सरकारी मान्यता म्हणजे आमच्यासाठी गौरव आहे.

महीलांची ताकत

हया सर्व प्रक्रियेमधुन या महीलामध्ये स्वतःमधील मोठेपणाची जाणीव निर्माण झाली आहे. त्यातुन निर्माण झालेला आत्मविश्वास खासीमपुट्ट गावातील परम्मा या महीलेने एकदा सरकारी अधिका-यांना जे सुनावले त्यातून परिचित होतो. त्या म्हणाल्या ''दरमहा तुम्हाला पगार मिळतो पैशाने तुमचा खिसा भरतो. पण मी माझ घर बीयाणाने भरले आहे. काय माझी बरोबरी करु शकता?''

सर्वसामान्यपणे महीलांना आपल्या समाजात मिळणारे दुय्यम स्थान हे आता या महीलांसाठी खोटे ठरले आणि ते केवळ त्यांनी निर्माण केलेल्या व जतन केलेल्या जैवविविध कृषि प्रणाली मुळे यामुळे त्यांना एक असे वरदान मिळाले की अखंड देशभरात या महीलांना ''महीला'' म्हणून मिळणारे दुय्यम स्थान समूळ मागे पडले. त्यांनी त्याच्या घरात, गावात , परिसरात स्वतःची ओळख बनवली. हया महीलांना शेतीच्या व पीकांच्या बाबती विचारल्या शिवाय, सल्ला घेतल्याशिवाय या भागात शेती केली जात नाही. कुटुंबाच्या शेतीमध्ये त्यांच्या मताला व निर्णयाला महत्वाचे स्थान आहे. चिलमामीदी लक्ष्मम्मा आपल्या पतीसोबत 3 एकर शेतीत दरवर्षी इझनभर वेगवेगळी पीके घेऊन शेती करत आहे. एकदा त्याला कोणीतरी सांगीतले की त्याने नवनवीन जातीचे हायब्रीड बियाणे वापरुन जास्त पीके उत्पादन करावे व एक प्रगतीशील शेतकरी बनावे. पण त्याला वाटले प्रथम आपल्या पत्नीचा सल्ला घ्यावा. धाडस एकवटुन त्याने तसे एकदा तिला विचारले. पण ती त्याच्यावर कडाडली.''तुम्हाला वेड तर नाही लागले? आपल्याला हायब्रीड बीयाणे, एकच पीक कशासाठी पाहीजे? आता आपण जे पिकवतो त्यामध्ये तुम्ही समाधानी नाही?'' आणि मग त्यांनी तो विषयच सोडला. या सारख्या हुशार व जागरुक महीलांना त्यांनी मिळवलेल्या विभागातील मान्यतामुळे त्यांच्या पतीकडून मानाची व आदराची वागणुक मिळते.

पी.व्ही. सथीश,
हे डेक्कन डेव्हलपमेंट सोसायटीचे संस्थापक सदस्य व महासचिव आहेत. अधिक माहीतीसाठी
email :satheeshperiyapatna@gmail.com
http//:www.ddsindia.com

मराठी अनुवाद : अनिल बोरा

Source : Cultivating Biodiversity, LEISA India Vol. 16 No.1, March, 2014